## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - मनोज गणेश संभारे,
वय - २८ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – बेलाड, ता.मलकापुर, जि.बुलडाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

मी फिर्यादी दिपक दिनकर चोखंडे याला ओळखतो. त्याचप्रमाणे मी सर्व आरोपींना ओळखतो, कारण ते माझे गावात राहतात. घटना कधी, कोठे व केव्हा घडली, याबाबत मला माहिती नाही. पोलीसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

२. असे घडले नव्हते की, घटनेचे वेळी आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली होती, त्यावेळी मी फिर्यादीला सोडविले होते.

**(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन त्याला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी भारतीय साक्ष अधिनियम २०२३ चे कलम १५७ नुसार देण्यात येत आहे.)**

३. हे म्हणणे खरे आहे की, लॉकडाऊन चे पुर्वी मी जी.एस.गोल्ड शेंगदाणा कंपनी, मलकापुर येथे काम करीत होतो, लॉकडाऊन नंतर मी माझे घरीच होतो. विजय गजानन संभारे याला मी ओळखतो, तो माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/०९/२०२० रोजी रात्री माझे जेवण झाल्यानंतर मी मित्र विजय संभारे सोबत गप्पा मारत बसलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी फेरफटका मारायचा म्हणून त्याचेसोबत बेलाड बस स्टॅंडकडे गेलो होतो, सदर ठिकाणी आरोपी मला व विजय संभारे यास फिर्यादीला मारहाण करताना दिसले होते, मोक्यावर मला मनोज संभारे याचे हातात लाकडी टेंम्पे दिसले, त्यावेळी मला फिर्यादीचे डाव्या हातावर व कानावर मार लागल्यामुळे रक्त निघाल्याचे दिसले, मी त्यांचे भांडण सोडविले, त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले, त्यानंतर मी व विजय संभारेने फिर्यादीला विचारणा केली असता योगेश काळे व सोमेश्वर संभारे यांनी मी त्यांचे नाव पोलीसांना सांगितल्याचे कारणावरून त्यांनी मला चापटा-बुक्क्यांनी मारहाण करून नाकावर बुक्का मारला व मनोज संभारेने त्याचे हातातील लाकडी

टेम्पे माझे डाव्या कानावर व हातावर मारून मला जखमी केले आणि शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याबाबत सांगितले, त्यानंतर फिर्यादीचे वडील व मामेभाऊ फिर्यादीला गाडीवर बसवुन पोलीस स्टेशनला घेवुन गेले.

४. आता मला माझे जबाबातील अधोरेखांकीत **भाग-अ** मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना माझे जबाब देते वेळी सांगितला नव्हता. तो पोलीसांनी माझे जबाबामध्ये का नमुद केला, याचे कारण मी सांगु शकत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचे प्रकरण आरोपींसोबत न्यायलयाबाहेर मिटविले आहे, त्यामुळे आरोपींना वाचविण्याकरिता मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपास- आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.जी.इंगळे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.03.11 17:03:15 +0530

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
मलकापूर.

दिनांक : ११.०३.२०२६